Impact Factor-7.675 (SJIF)


ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

March -2020





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | सतीश तराळांची ग्रामीण कथा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ. अलका गायकवाड–लुंगे | 1 |
| 2 | मत्तेची बँकींग क्षेत्रातील उपयुक्तता | डॉ. सौ. सपना आर. वेगीनवार | 5 |
| 3 | बालसंगोपनात पालकांसमोरी आव्हाने | प्रा. सुषमा जयकुमार फरसोले | 8 |
| 4 | आधुनिकव कौटिलीय कूटनीती आणि जातकीय खत्तिविज्जावादाचे विवेचन | डॉ. ओमकुमार टोम्पे | 11 |
| 5 | काले धन के स्त्रोत प्रभाव एवंनियंत्रण करने के लिए सुझाव–एक अध्ययन | प्रा. डॉ. ए.बी.पटले | 18 |
| 6 | पंचायतराज मधील महिला नेतृत्व व वास्तव | प्रा. गौतम कांबळे | 23 |
| 7 | आदिवासी समाजातील कुमारी मातांची वर्तमान स्थिती. | प्रा. डॉ. श्रीराम खाडे | 26 |
| 8 | अर्थव्यवस्थेच्या विकासात सरकारची भूमिका | डॉ. प्रदीप दरवरे | 31 |
| 9 | महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसा याबाबतचे विचार | प्रा. डॉ. सुभाष के. पवार | 35 |
| 10 | महात्मा गांधी का दृष्टिकोण एवं प्रबन्धकीय कौशल | डॉ. मधुलता व्यास | 39 |
| 11 | महात्मा फुले यांच्या दृष्टिकोनातुन वंचितांचा इतिहास –एक मिमांसा | फकिरा भगवान राजगुरू | 43 |
| 12 | महिला व बालक हक्क अधिकार कायदा व सुव्यवस्था टिकात्मक परीक्षण | प्रा. डॉ. निना सा. चवरे | 50 |
| 13 | कामायनी महाकाव्य की प्रासंगिकता | विक्रम बालकृष्ण वारंग | 55 |
| 14 | किसान क्रेडिट कार्ड योजना : एक अध्ययन | प्रा.डॉ.शालिनी के.पांडे | 60 |
| 15 | महात्मा जोतीराव फुले व समकालीन समाजसुधारक पंडिता रमाबाई | प्रा. डॉ. सुनिल चवळे | 64 |

| | | |
|---|---|---|
| 16 | मुद्रा योजनेची कामगिरी<br>महाजन संजय बाबुराव | 67 |
| 17 | वित्तीय बाजारपेठा आणि वित्तीय संस्था यामधील समन्वय<br>प्रा.डॉ. संजय उ. उल्हे | 80 |
| 18 | Digital Profiling As A Threat To Democracy **Dr. Jyoti D. Thakare** | 82 |
| 19 | Impact of Nature on Occupation Structure of Tribal Population in Chikhaldara Tahsil of Amravati District (Maharashtra State)<br>**Dr. Aruna P. Patil** | 85 |
| 20 | Gender Justice In Modern India **Dr. Suprabha P. Yadgirwar** | 92 |
| 21 | Assessment of Temporal Change in Crop Cultivation of Southern AhmednagarDistrict : A Case Study of Shrigonda Tahsil<br>**Dhawale Ganesh, Devne Manojkumar, Mundhe Nitin** | 97 |
| 22 | Historical And Social Traumas In Toni Morrison's Beloved<br>**Dr. A. Chandramouly,** | 103 |
| 23 | An Analytical Study of GST **S. P. Rathod** | 106 |
| 24 | Implementation of New Syllabus of Compulsory English for B. A. III in Gondwana University, Gadchiroli **Dr. Dayanand R. Mane** | 111 |
| 25 | Mental Health Status of Married Working Woman in India<br>**Rekha Shriramji Nimbhorkar, Yawalikar** | 115 |
| 26 | A study of Impact of Demonetization on the growth of Mutual Fund industry Sector in India **Dr. B.M.Chachane** | 118 |
| 27 | Exploration of Personality Traits in Kamala Das's Poetic Works<br>**Dr. G.O. Jondhalekar** | 126 |
| 28 | Role of Indian Banks in Maintaining Ecological Balance<br>**Dr. Sanjay Uddhavrao Deshmukh** | 130 |
| 29 | Documentation on Some Ethnic Plant Species of Darwha Region Dist. Yavatmal (M.S.) India **Chavhan V. N.** | 134 |
| 30 | Contribution of Yoga to Sports **Dr. Purnima Giri Kapta** | 139 |
| 31 | The Role Of Micro, Small And Medium Scale Industries In Development Of Aurangabad **Dr. Vaibhav Popatrao Kawade** | 143 |
| 32 | Academic and Administrative Audit: Need for quality improvement in HEI's **Dr. KalpanaVajpeyi** | 147 |

| | | |
|---|---|---|
| 33 | श्री नागदेवचार्य जीवन व कार्य प्रा. डॉ. कल्पना व्य. मेहरे | 149 |
| 34 | व्यंकटेश माडगूळकरांच्या तरल कथादृष्टीचा आविष्कार : 'उंबरठा' प्रा.छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 153 |
| 35 | आदिवासींच्या जीवनावर धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम डॉ. निलिमा वाय. भोगे | 156 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# आदिवासींच्या जीवनावर धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम

डॉ. निलिमा वाय. भोगे
सहयोगी प्राध्यापक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा.

मानवी समाजाच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी वेगवेगळे कालखंड सांगितले आहे. शेतीचा शोध लागल्यानंतर मानव एका ठिकाणी स्थिरावला व दिर्घकाळपर्यंत एकाच ठिकाणी अनेक लोक वास्तव्यास राहु लागली त्याच वेळेस समाज नावाची संकल्पनांना जन्म मिळाला तेव्हा शास्त्रीय आधार नसला तरी कालांतराने जेव्हा समाजाचा अभ्यास करण्याची सुरुवात झाली तेव्हा वरिल समाजाची परिस्थीती समजुन घेणे गरजेचे वाटले. समाजाच्या उत्पत्तीच्या कालखंडापासूनच धर्म सुध्दा तितकाच जुना असलेला दिसुन येतो. फक्त फरक एवढाच होता की, धर्माचे अस्तीत्व अगदीच प्राथमीक स्वरुपाचे होते.

सुरुवातीच्या कालखंडामध्ये धर्माच्या नावावर कोणत्याही प्रकारचे स्त्री–पुरुष किंवा इतर, मानवा–मानवांमध्ये भेद केल्या जात नव्हते. धर्म अगदी जीवन जगण्याचा सुंदर आधार होता. अलौकिक, अध्यात्मिक, समाधान नैसर्गिक संरक्षण इत्यादी दृष्टिकोनातून धर्माची गरज आदिवासींना वाटायला लागली व त्यातून कर्मकांडी स्वरुपी समाज व्यवस्था निर्माण झाली. आदिवासी लोक आपले सामाजिक जिवनाचा भाग म्हणून धार्मिक प्रतिकांना महत्व देउ लागली प्रत्येक सन, उत्सव, विधी, पुजा अर्चा मध्ये धार्मिक प्रतिकांचे महत्व वाढत गेले व त्यामधुनच धर्म संकल्पना विस्तारत गेली.

हिंदु धर्म, ख्रिश्चन धर्म, मुस्लिम धर्म, बौध्द धर्म इत्यादि धर्मा प्रमाणेच 'आदिवासी धर्म' अशी नोंद १९३१ आदिच्या जनगणना अहवालात होत असे परंतु १९३२ पासुन जनगणना करतांना आदिवासी धर्म अशी स्वतंत्रपणे नोंद केल्या गेली नाही. जनगणना करतांना काही आदिवासींनी आपला धर्म आदिवासी आहे असे सांगीतले तरी त्यांची नोंद अन्य धर्म या प्रकारामध्ये करायची असा निर्णय त्या काळातील शासनाने घेतला. भारतीय आदिवासींचा धर्म कोणता? या बाबतीत अनेक विचारवंत, अभ्यासकांमध्ये बरिच मते मतांतर होती. जीवात्मवाद अशी धर्म श्रध्दा असणाऱ्या आदिवासींचा धर्म हा हिंदु धर्मपिक्षा वेगळा आहे त्याला आदिवासी धर्म संबोधने योग्य ठरते असे काही अभ्यासकांचा आग्रह आहे. आदिवासींच्या धर्मासंदर्भात आजही अनेक मतेमतांतरे कमी, अधिक प्रमाणात दिसुन येतात म्हणून आदिवासींच्या धर्मश्रध्दा आणि धार्मीक प्रथांचे अध्ययन करणे गरजेचे आहे. तत्पुर्वी आपण धर्माचा अर्थ लक्षात घेउयात.

**धर्माचाअर्थ :–**

धर्म हा मानवी समाजा एवढाच प्राचीन आहे. धर्माचा अभ्यास विविध दृष्टीकोनातून केला गेला आहे. जसे तत्वज्ञान, इतिहास, धर्मशास्त्र समाजशास्त्र इत्यादी शास्त्राचा तो अभ्यास विषय आहे. अन्य शास्त्राप्रमाणेच सामाजिक मानव शास्त्रात आदिवासी धर्माचा अभ्यास केला जातो. आदिवासी धर्माच्या अभ्यास करण्याच्या संदर्भात टायलर, फ्रेजर, मॅलीनो व्हस्की, या सामाजिक मानवशास्त्रज्ञाचे योगदान महत्वाचे आहे.

**किंग्जले डेव्हिस यांच्या मते :–**

'धर्म ही मानवी जीवनात एवढा सार्वत्रीक, शाश्वत व व्यापक आहे कि, धर्माचे स्वरुप लक्षात घेतल्याशिवाय समाजाच्या स्वरुपाचे यथार्थ आकलन होउ शकत नाही.

**एडवर्ड टायलर :–**

यांनी अगदी सोपी व सुटसुटीत व्याख्या केली आहे. त्यांच्या मते "दैवी विभूतीच्या अस्तीत्वावरिल श्रध्दा म्हणजे धर्म होय."

**सर जेम्स फ्रेजर यांच्या मते :–**

"मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या आणि ज्या मानवी जीवनाचे नियंत्रण करतात त्या शक्तींना अनिष्ठ टळावे म्हणून प्रसन्न करुन घेण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे धर्म होय."

**मॅलीनो व्हस्की:–**

यांनी व्याख्या करतांना समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय अशा दोन्ही बाजुचा आढावा घेतला. त्यांचा मते "धर्म हा श्रध्दा व विधी यांचा व्यवस्था आहे तसेच धर्मही एक सामाजिक घटना व वैयक्तिक अनुभुती आहे."

**प्रा. बॅलर्ड यांच्या मते :—**

सामाजिक परिस्थीतीत आढळुन येणारे, अमुर्त, अदृश्य, अनोळखी व अप्रतिबध्द अशा शक्तीशी मिळते—जुळते घेण्याची प्रक्रिया म्हणजे धर्म होय.

वरिल सर्व व्याख्यांवरुन आपल्याला असे निदर्शनास येते की, मानवापेक्षा कुठल्यातरी श्रेष्ठ शक्तीवर ठेवलेला विश्वास यावर आधारित सामाजिक जीवनाची रचना व कार्य यांचा मिलाप णर्म या संकल्पनेच्या माध्यमातून दिसून येतो.

**धर्माच्या उत्पत्तीचे सिध्दांत :—**

धर्माच्या उत्पत्तींच्या सिध्दांतासंदर्भात अनेक विचारवंतांनी अभ्यासकांनी वेगवगळे सिध्दांत मांडले या सिध्दांताचा थोडक्यात विचार करने महत्वाचे आहे. तेव्हाच आपण धर्माची संकल्पना अधिक चांगल्यानी समजुन घेउ शकु.

१. <u>सर्वात्मवाद किंवा आत्मवादाचा सिध्दांत</u> :—

या सिध्दांताची मांडणी एडवर्ड टायलर यांनी केली व त्यामध्ये स्पेन्सर यांनी देखील भर घातली. टायलर यांच्या मते आत्म्याच्या अस्तीत्वावरिल विश्वास हाच सर्व मानव समाजातील धर्माचा प्रारंभ बिंदु आहे. अगदी सुरुवातीपासुन तर आधुनिक व्यवस्थेचा धर्माचा आधार हा आत्म्याची संकल्पना आहे. टायलरने स्वप्न आणि मृत्यू यांचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम विषद करुन धर्मसंकल्पनेचा उदय झाला असे स्पष्ट केले. आत्म्याच्या ठिकाणी मानवी जीवनाचे संचलन असते.

म्हणूनच त्याला प्रसन्न करण्याकरिता वेगवेगळया पुजाअर्चा करणे विधी, कर्मकांड करणे यातून आपले जीवन सुकर होईल ही त्यामागची धारणा आहे.

२. <u>चेतनावाद किंवा मानावाद सिध्दांत</u> :—

यांनी चेतनावाद / मानावादाचा सिध्दांत मांडला, त्यानी या जगामध्ये प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तु मध्ये एक अलौकिक शक्ती असते व ही अलौकिक शक्ती संपुर्ण सृष्टिचे नियंत्रण करित असते म्हणून स्वतः व समाजाचे हित लक्षात घेउन वेगवेगळया प्रकारच्या पुजा, अर्चा, विधी, कर्मकांड यांच्या माध्यमातून या अलौकिक शक्तीला प्रसन्न केले जाते. या अलौकिक शक्तीलाच माना, बोंगा असे म्हटले जाते. या संदर्भातील वेगवेगळे अतार्किक संदर्भ मांडुन धर्माची उत्पत्ती या शक्तीच्या माध्यमातून झाली असल्याचे अनेकांनी स्पष्ट केले.

३. <u>निसर्गवादाचा सिध्दांत</u> :—

ळा सिध्दांत सुध्दा जर्मन विचारवंत मॅक्समुलर यांनी मांडला नैसर्गिक शक्तीच्या ठिकाणी अलौकिक शक्ती आहे अशा संकल्पनेतून कर्मकांड, पुजा, अर्चा, विधी यांचा प्रारंभ झाला व तिथूनच धर्म नावाच्या संकल्पनेची सुरुवात झाली मॅक्समुलरने सांगीतले की आदिवासी मानवांवर निसर्गाचा फार मोठा प्रभाव होता. निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनांमागील कारणे तो जानु शकत नव्हता उदा. ऋतू चक्र, सुर्य उगवणे व मावळणे, ढगांचा कळकळाट, विजांचा आवाज मुसळधार पाउस परिणामी त्यांच्या मनात भिती निमाण होत होती व या भितीपोटीच तो वेगवेगळे कर्मकांड करून धर्म संकल्पना रूढ करत गेला.

**४. प्रकार्यवादाचा सिध्दांत :—**

या सिध्दांताचे समर्थन रॉबर्ट स्मिथ मॅलिनो व्हस्की, मॅक्स वेबर, पारसन्स या विचारवंतांनी केले. या विचारवंतांनी कुटूंब व विवाह या संस्थे प्रमाणेच धर्मसंस्थाही सुध्दा महत्वपुर्ण मानली त्यांनी धर्माच्या उदयापेक्षा कार्याला जास्त अधोरेखीत केले त्यांच्या मते.

१) धर्म व्यक्तीला समुहाशी एकरूप करतो.

२) असुरक्षित व्यक्तीस मानसीक सुरक्षितता प्राप्त करतो.

३) निराशा दुःख संकट या काळात व्यक्तीचे सांत्वन करतो व तिची नितीमत्ता वाढवतो.

४) समाजातील प्रस्थापीत मुल्य व उद्दिष्ट यांचे महत्व वाढवुन समाजाचे संघटन व नियंत्रण घडवून आणतो.

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

५) सामाजिक सिध्दांत :—

या सिध्दांताची मांडणी दुर्खीम यांनी केली यालाच धर्माचा समाजशास्त्रीय सिध्दांत असेही म्हणतात. त्यांनी या सिध्दांताची मांडणी पवित्र आणि अपवित्र संकल्पनांच्या आधारावर केली. दुर्खीम यांनी आपल्या सिध्दांताची मांडणी आस्ट्रेलीयन अरूंटा या आदिवासींचा अभ्यास करून मांडली दुर्खीमच्या मते कुलप्रतिकवाद हा धर्माचा सर्वात प्राथमिक प्रकार होय. अरूंटा जमात विविध कुलात विभागली आहे. एका कुलातील सर्व सभासदांचे पूर्वज समान असतात कुलात अंतरविवाह होत नाही. सभासदांना न्याय मिळवुन देण्यात येतो. एखाद्या प्राणी किंवा वनस्पती कुलाचे प्रतिक असते हे कुलचिन्ह पवित्र मानन्यात येते यांची शुध्दता टिकवुन ठेवण्यासाठी विधी निषेध, नियम, पुजाअर्चा समारंभ याचा जन्म होतो व्यक्ती श्रध्दा व भितीपोटी यांच्यापुढे नतमस्तक होतो आणि यातूनच तो धार्मिक अनुभूती घेतो.

संशोधन पध्दती :—

संशांधनकर्ती मागील बारा वर्षापासुन डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत त्यापुर्वी त्या अनेक वर्ष मेळघाटमध्ये आदिवासींकरिता काम करित होत्या. संशोनधनकर्ती समाजकार्य महाविद्यालयात समाजशास्त्राच्या प्राध्यापीका असल्याने विद्यार्थ्यांना धर्मव्यवस्था शिकवीत असतांना तसेच दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना आदिवासी समुदायातील परिवर्तन शिकवत असतांना त्यांच्या लक्षात आले की आदिवासींच्या जीवनावर धर्माचा फार मोठा प्रभाव होता परंतु आता त्यांच्यात आधुनिक धर्म उदा. हिंदु, ख्रिश्चन, मुस्लिम यांचा प्रभाव पहावयास मिळतो म्हणून त्यांनी अध्ययनकरिता आधुनिक धर्मव्यवस्थेचा आदिवासींच्या जीवनावर झालेला परिणाम या विषयाची निवड केली.

अध्ययनाची उद्रिष्टये :—

१. आदिवासींच्या पुजा, अर्चा व आधुनिक धर्माचा प्रभाव जाणून घेणे.
२. आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने.
३. आदिवासींच्या विवाह पध्दतीवर आधुनिक धर्मव्यवस्थेचा झालेला परिणाम जाणून घेणे.
४. आदिवासींच्या सामाजिक जीवनावर धर्माचा झालेला परिणाम अभ्यासने.

गृहित कृत्ये :—

१) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या पारंपारिक पुजा, अर्चा मध्ये बदल झाला.
२) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सांस्कृतीक जीवनामध्ये बदल झाला.
३) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या विवाह पध्दतीत बदल झाला.
४) आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या सामाजिक जीवनात परिवर्तन झाले.

संशोधनकर्ती आदिवासी विभागात कार्यरत असून मेळघाट, गडचिरोली, यवतमाळ इत्यादि अभ्यास दौऱ्याच्या निमीत्याने ती अनेक स्वयंसेवी संस्था कार्यकर्ते आदिवासी गावातील ग्रामपंचायत, सरपंच, सदस्य, महिला, वृध्द व्यक्ती, आदिवासी युवक, युवती, अंगणवाडी सेविका तसेच महाविद्यालयातील आदिवासी युवक, युवती, वनकर्मचारी तसेच मेळघाट मध्ये वास्तव्यात असताना त्यांचे सुक्ष्म निरीक्षण यातूनच या विषयाची त्यांनी मांडणी केली आहे.

१) आदिवासी पुजा, अर्चा व आधुनिक धर्म :—

आदिवासींच्या जीवनात पुजा, अर्चेला फार महत्वाचे स्थान आहे. आदिवासी लोक आपल्या कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात ते पुजाअर्चा करुन करतात उदा. शेतीची पेरणी, विवाह, पीक काढणी इत्यादी. त्यांच्या पुजा—अर्चेमध्ये प्रामुख्याने त्यांच्या पारंपारिक देवाचा समावेश असतो तसेच गंडे—दोरे, धागे, नवीन कपडे बांगडया इत्यादींचा समावेश असतो परंतु आधुनिक धर्माच्या प्रभावामुळे जे आदिवासी ज्या—ज्या धर्माच्या संपर्कात आले आहे त्या—त्या धर्माच्या देवतानुसार / धर्मानुसार पुजा करायला लागले उदा. हिंदु धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हिंदु धर्माच्या देव—देवतांची पुजा करायला लागले. ख्रिश्चन धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी ख्रिश्चन धर्माच्या रितीनियमानुसार पुजा करायला लागले तर मुस्लिम धर्माच्या संपर्कात आलेले आदिवासी हे मुस्लिम धर्माच्या रितीनीयमानुसार पुजा करायला लागले आज अनेक आदिवासी विभागातील वेगवेगळया धर्माची मंदिर, चर्च बघावयास मिळते यावरुन असे लक्षात येते की आदिवासी पारंपारिक धर्मामध्ये आधुनिक धर्माचा हस्तक्षेप होउन त्यांच्यामध्ये परिवर्तन होत आहे.

२) आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर धर्माचा प्रभावः—

आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनावर देखील धर्माचा फार मोठा प्रभाव पडलेला आपणास दिसुन येतो आदिवासी समुदायामध्ये सांस्कृतिक जीवन हे पारंपारिक स्वरुपाचे होते. अनेक समुदायांमध्ये युवागृह / गोटुल नावाची संकल्पना अस्तीत्वात होती या गोटुल युवा गृहामध्ये ७ वर्षापासुन तर लग्न होईपर्यंत मुल, मुलीस काळी सायंकाळी एकत्र यायची गाणी नाच यामध्ये मग्नव्हायची आपले पारंपारिक नृत्य गाणी शिकायचे तसेच गावामध्ये कोणत्याही कार्यक्रम प्रसंगी ते सादर करायचे लग्न समारंभ, उत्सव इत्यादी प्रसंगी पारंपारिक नृत्य यांना महत्वाचे स्थान असायचे परंतु आज आधुनिक धर्मव्यवस्थेचा प्रभाव आदिवासींच्या जीवन पध्दतीवर झालेला आहे आज अनेक उत्सव कार्यक्रमप्रसंगी सिनेमाचे गाणे लावतात मुलेमुली सिनेमांच्या गाण्यांवर नृत्य करतात. अनेक धार्मीक कार्यक्रमामध्ये सुध्दा परिवर्तन झाले उदा. आज मोठया प्रमाणात आदिवासी समुदायामध्ये गणेश उत्सव, दुर्गोत्सव, ख्रिसमस, गुडफ्रायडे इत्यादी उत्सव साजरे केले जातात.

३) आदिवासींच्या विवाहपध्दतीवर धर्माचा प्रभाव.

आदिवासींच्या विवाहपध्दती हया वेगवेगळया स्वरुपाच्या आपणास दिसून येतात. वेगवेगळया जमातीमध्ये जोडीदार निवडण्याच्या वेगवेगळया पध्दती आहेत. आदिवासींची विवाह पध्दती ही फार साधी आणि आगळीवेगळे आहे. अनेक आदिवासींमध्ये आाजही विवाहाच्या वेळेस वधु मूल्याची प्रथा अस्तीत्वात असलेली दिसुन येते. अगदी साध्या पध्दतीने विवाह व्हायचे कोणत्याही प्रकारच्या लग्नांमध्ये मोठेपणा नसायचा आपआपल्या एपतीप्रमाणे पाहूण्यांना बोलावून त्यांचे आगतस्वागत करून आदिवासी त्यांच्या विवाह विधीप्रमाणे विवाह पार पाडायचे परंतू आज विविध धर्माचा शिरकाव आदिवासी समुहामध्ये झाल्याने त्यांच्या विवाहपध्दतीत बदल झालेला दिसुन येतो. उदा. मेळघाटमध्ये जे आदिवासी हिंदू धर्मियांच्या संपर्कात आले त्यांच्या विवाह पध्दतीवर हिंदु धर्मीय विवाह पध्दतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो जसे मंगलअष्टके, मंडप, बॅंड इत्यादि. ख्रिश्चन धर्मियांच्या जे आदिवासी समूदाय संपर्कात आले त्यांच्या विवाह पध्दतीवर ख्रिश्चन धर्मीयांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. उदा. अनेक आदिवासी चर्चमध्ये विवाह करतात तर जे आदिवासी समुदाय मुस्लिम धर्माच्या संपर्कात आले त्यांच्या वैवाहीक पध्दतीवर मुस्लिमधर्मी यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो अशारितीने ज्या—ज्या आदिवासी समुदायचा वेगवेगळया धर्मिय लोकांच्या अधिक संपर्कात आले त्या—त्या धार्मिक विवाह पध्दतीचा प्रभाव आदिवासी विवाह पध्दतीवर झालेला दिसुन येतो.

५) आदिवासींच्या आर्थिक जीवनावर धर्माचा प्रभावः—

अनेक वर्षापर्यंत आदिवासींचे आर्थिक जीवन एकप्रकारे स्वयंपूर्ण स्वरूपाचे होते. त्यांच्या मर्यादित गरजांची पुर्तता ते त्यांच्या समुहाच्या माध्यमातून करित होते. परंतू जेव्हा आदिवासी समुदाय वेगवेगळया धर्मीयांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या खानपानाच्या सवयी बदलल्या अनेक निषेध नियम लागु करण्यात आले. त्यांचे जंगलावर आधारित असलेले जीवन उदा. मासेमारी, पशूपक्षांचा शिकार यावर निर्बध यावयास लागली त्यामुळे त्यांना वेगवेगळया ठिकाणी मोलमजुरी करून जीवनाचा उदरनिर्वाह करण्याची पाळी आली. अर्थव्यवस्थेला वेगवेगळे स्वरूप प्राप्त झाले त्यांच्या पारंपारिक व्यवसायाच्या जागी नवनवीन कार्य व व्यवसायाची भर पडत गेली. अनेक धर्मविधीकरिता त्यांना पैशाच्या स्वरुपात खर्च यायला लागला धर्म उत्सव साजरे करित असतांना त्यांच्याकडुन पैसे गोळा केल्या जाउ लागले त्यामुळे धर्माच्या नावावर त्यांच्या आर्थिक परिस्थीतीमध्ये एकप्रकारे हस्तक्षेप होउ लागला.

६) आदिवासींच्या सामाजीक जीवनावर धर्माचा प्रभाव :—

एकंदरित आदिवासींचे संपुर्ण जीवन हे वेगवेगळया धर्मने प्रभावीत केले. आदिवासींच्या पारंपारिक प्रथा, परंपरा रूढी प्रमाणके यामध्ये बदल होउन नव धर्माच्या रूढी, प्रथा, परंपरा ते आत्मसात करावयास लागले. आज आदिवासींमधील अनेक पारंपारिक विधी आजच्या तरूण पीढींना माहित नाही. कोरकू मधील शिदोली नावाचा प्रकार आदिवासी मधून यूवागृह, गोटुल अशा वेगवेगळया नावांनी जे आदिवासींचे सांस्कृतीक सामाजिक भवन होते. त्यांच्या मोठया प्रमाणात लोप होतांना दिसत आहे. आदिवासींचे पारंपारिक खेळ, नृत्य यांची ही हळूहळू लोपाकडे वाटचाल सूरू आहे. कारण अनेक तरूण मुलामुलींना पारंपारिक नृत्य, गाणी येत नाही तर वेगवेगळया

धर्मीयांची गाणी ते आपल्या घरी कार्यक्रमांमध्ये वाजवतांना दिसतात एवढेच नव्हे तर अनेक आदिवासी तरूण तरूणींची मोबाईल रिंगटोन सुध्दा धार्मीक गाण्याची, स्टेटस धार्मीक देवदेवतांची पहावयास मिळतात. त्यांच्या वेशभुषा, केशभुषा पुर्णपणे बदलल्या आहेत एवढेच काय ते एकमेकांसोबत सुध्दा कधी कधी आपली मातृभाषा सोडून मराठी, हिंदी भाषेमध्ये बोलतात यावरून त्यांच्या सामाजिक जीवनात मोठया प्रमाणात बदल झालेला दिसुन येतो.

**निष्कर्ष :—**

आज आदिवासींच्या परंपरागत जीवनपध्दतीमध्ये मोठया प्रमाणात बदल होतांना दिसत आहे. आदिवासी संस्कृतीचा लोप होतांना दिसत आहे. पुर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या समुदायामध्ये वास्तव्य करून स्वत:च्या धर्माचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणात केला त्यानंतर हिंदु, मुस्लिम समुदाय देखील आदिवासींना आपल्या धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न करित आहे त्याचा परिणाम म्हणून आज अनेक तरूण तरूणींना स्वत:चे दैवत माहीत नाही. पारंपारिक पुजाअर्चा करता येत नाही त्यांची सांस्कृतीक साधने व माध्यमे बदलली आहे. विवाह विधी सन उत्सव यामध्ये देखील बदल झालेला दिसतो त्यांची युवा गृहे, गोटुल इत्यादी पध्दतीचा लोप होत आहे. पारंपारिक गाणी नृत्य विसरत चालली आहे. एकंदरितच संपुर्ण आदिवासी जीवन आज वेगवेगळया धर्मानि प्रभावीत झालेले दिसुन येते गावांमध्ये गेल्यानंतर वेगवेगळया धर्माची मंदिरे, चर्च बघावयास मिळतात, वेगवेगळया धर्माची प्रतिके बघावयास मिळतात, त्यांचा स्वतंत्र असलेला आदिवासी धर्माचे अस्तीत्व आज गावांमधुन नामशेष होत आहे व नवधर्म रचना गावांमध्ये प्रवेश करताना दिसत आहे.

**संदर्भग्रथ सूची:—**


१) लोटेरा. ज (२०१०). 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', पिंपळापुरे अॅड क पब्लिशर्स नागपूर ४४४००३२.

२) खडसे भा. की (१९९९). 'सामाजिक मानवशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन श्री शांता दुर्गा निवास २३, नविरामदास पेठ नागपूर ४४४००१०.

३) नेहरू पंडित जवाहरलाल (१९९७). 'भारत कि खोज' (मराठी आवृत्ती साने गुरूजी व करंदीकर) कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे.

४) आंबेडकर डॉ. बाबासाहेब (अनुवाद घोडेस्वार देविदास). 'बुध्द आणि त्यांचा धम्म' डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशीएशन नागपूर.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग—३ खंड—१८, प्रकाशन उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन २००२.

६) कऱ्हाडे स. दा. (२०११). 'समाज प्रबोधन' लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद.

७) मिश्र रामनाथ (१९९४). प्राचीन भारतीय समाज, अर्थव्यवस्था एवं धर्म भोपाळ, व्दितीय आवृत्ती.

८) जिज्ञासू चंद्रिका प्रसाद (१९८६). 'भारत के आदी निवासीयो की सभ्यता' लखनउ अष्ठम संस्कारन.